# सुधांजली

सुधाकर कुळकर्णी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७८९



REFBK-0023855
REFBK-0023855

संदर्भ काव्य
२४७९
२३८५५

# सुधांजली

कवी सुधाकर कुळकर्णी

REFBK-0023855
REFBK-0023855

आशिष प्रकाशन, मुंबई.

सर्व हक्क
© सौ. अंजली कुळकर्णी
१२ / २ शामियाना
इरला लेन
विलेपारले (पश्चिम)
मुंबई नं. ४०००५६

प्रकाशक
आशिष कुळकर्णी
१२ / २ शामियाना
इरला लेन
विलेपारले (पश्चिम)
मुंबई नं. ४०००५६

मुद्रक -- एस. आर. सांवत
अशोक प्रिंटिंग प्रेस
खेतवाडी मेन रोड
गिरगांव, मुंबई नं. ४००००४.

ठसे -- धारगळकर प्रोसेस प्रायव्हेट लिमिटेड
अेलार बिल्डिग.
५३४ अेस्. वी मार्ग
दादर, मुंबई नं. ४०००२८

किंमत -- रु २०

मृखपृष्ठ व आंतील रेखाचित्रे -- श्री. प्रमोद जोशी
२९ मुरलीधर निवास
वाघ मार्ग, दादर, मुंबई नं. ४०००१४

माझे

पूज्य वडील

कै. अच्युत बाळकृष्ण कुळकर्णी

यांस

# - मनोगत -

'सुधांजली' हा गीतसंग्रह रसिकांच्या हाती देताना मनाला विलक्षण समाधान व आनंद होत आहे. या संग्रहातील प्रत्येक गीत शब्दामृताचा एक एक थेंब होऊन आपल्या रसिक मनाची तहान शमविण्यासाठीं काव्यरसाने परिपूर्ण होऊन ओंजळीने आपल्या वाटचाला येत आहे.

जीवन हे इंद्रधनुष्यासारखे सप्तरंगी आहे. जीवनाची प्रदीर्घ वाटचाल करताना अनेक प्रिय व्यक्ति–वेगवेगळ्या स्वभावाच्या, मनाच्या अन् रूपाच्या नेहमीच योगायोगाने भेटत असतात. काही व्यक्ति आपल्याला अतिशय आवडतात व त्यांच्या गोड आठवणीचा अमोल ठेवा हृदयांत जपून आपण एका वेगळ्याच विश्वात रममाण होतो. कधी प्रीतीचे तर कधी विरहाचे क्षण जीवनात वारंवार डोकावतात. ऊन पाऊस यांचा लपंडाव, हिवाळा उन्हाळा यांचा हंगाम अन् सुख व दुःख यांच्या सावल्या–जीवनाच्या रम्य उद्यानात या त्रिवेणी संगमाच्या गोड आंबट आठवणी ऋतूप्रमाणे फुलतात आणि कोमेजतात, परंतु कांही आठवणी मात्र चिरस्मरणीय ठरतात. त्या आठवणी तहानलेल्या मनाला तोषवितात– व्याकुळलेल्या मनाशी हितगुज करतात अन् भावनांचा खेळ खेळुन जीवनांत सदैव साथ देतात. जीवनाच्या विविध छटा काव्यरुपाने आपल्या रसिक मनाचे मनोरंजन करतील हे या गीतसंग्रहाचे एक आशास्थान आहे.

प्रस्तुत गीतसंग्राहातील प्रत्येक गीत हे प्रीती आणि विरह या जीवनातल्या दोन भावस्पर्शी अंगावर आधारित आहे व त्यांना कल्पनेची किनार आहे. प्रीती आणि विरह या क्षणभर दोन सख्ख्या बहिणी मानल्या तर त्यांचे किती अतूट नाते आहे हे संपूर्ण गीतसंग्रह वाचल्यानंतर रसिकांच्या ध्यानात येईल. रसिक मनाला कदाचित गीतांचा परामर्ष घेताना एकसूरीपणा वाटेल परंतु जेव्हा मन जीवनाकडे वळून पहाते तेव्हां पदोपदी वाटचाला आलेले उन्हाळे हिवाळे आणि ऊन पाऊस यांचा हंगाम आठवतो अन् त्याच्या सुखद अशा फुललेल्या आठवणी कळ्याफुलावर विहार करणाऱ्या भ्रमराप्रमाणे मनाशी गुंजारव करू लागतात.

हा गीतसंग्रह म्हणजे एका कविमनाचे स्वप्न साकार झाले आहे. केवळ रसिकांच्या सेवेसाठी, रसिकांना आनंद देण्यासाठीं–ही एक शब्दामृताची ओंजळ आहे–कधीच रिती न होणारी व रसिकांना हवी हवीशी वाटणारी...

या गीतसंग्रहाबाबत रसिकांना आठवण करून देण्यास मला अभिमान वाटतो कीं संग्रहाच्या ' छपाई ते प्रकाशन ' या प्रवासात माझे एक जवळचे मित्र प्रा. अवधूत शास्त्री यांनी मला प्रदीर्घ साथ दिली आहे. प्रा. शास्त्री हे एन्. डी. कॉलेजमध्ये संस्कृत व मराठी विषयांचे प्राध्यापक आहेत. शिवाय ते ' धर्मभास्कर ' या अतिशय लोकप्रिय झालेल्या मासिकाचे संपादक आहेत. त्यांची बहुमोल मदत व अचुक मार्गदर्शन वेळोवेळी मला लाभले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच आजचे आघाडीचे चित्रकार श्री. प्रमोद जोशी यांनी माझ्या प्रत्येक गीताला समर्पक अशी चित्रे काढून चित्ररुपाने गीतातील कल्पनांना सौन्दर्याचा मुलामा देऊन गीतसंग्रह सुशोभित करण्यास हातभार लावला आहे त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

प्रस्तुत गीतसंग्रहातिल काही गीतांना सुरांचा साज देऊन गीते श्रवणीय व लोकप्रिय करण्याचे तसेच दूरदर्शन, आकाशवाणी व कॅसेट्स या माध्यमातून रसिकांच्या घरोघरी माझी गीते ऐकविण्याचे श्रेय माझे अगदी जवळचे सगीतकार मित्र श्री. अशोक पत्की व श्री. प्रभाकर पंडित यानी केले आहे. या दोन्ही संगीतकारांनी मला प्रकाशात आणण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्याबद्दल मी खरोखरच त्यांचा ऋणी आहे.

गीतसंग्रहाच्या छपाईचे काम अशोक प्रिन्टर्स खेतवाडी, (मुंबई) यांनी अतिशय सुबक रीतीने अपेक्षेपेक्षा लवकर करून दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच चित्रांचे ठसे बनविण्याची जबाबदारी धारगळकर प्रोसेस प्रायव्हेट लिमिटेड यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडली आहे व विलंब न लावता वेळेवर काम पूर्ण केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

मुखपृष्ठाच्या छपाईचे काम दिवेकर ब्रदर्स ( मिलन इंडस्ट्रियल इस्टेट, लालबाग, मुंबई ) यांनी अत्यंत कुशलतेने व कल्पकतेने केले आहे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

# प्रस्तावना

सुधांजली हा गीतरचनांचा संग्रह आहे. आज हा संग्रह पुस्तकरूपाने समाजासमोर येत असला तरी त्यांतील बरीचशी गीते स्वरपंख लावून अनेक घरांत पोचलेलीच आहेत. अशा गीतांचा मुद्रित संग्रह प्रकाशित होणे हा केवळ एक उपचार असतो. आपल्या रचना पुस्तकांच्या कोठडीत बंद करण्याचा हेतू रचनाकाराच्या मनात नसतोच. वाऱ्यावर सोडून दिलेली आपली गीते कधी-तरी संहितेच्या रूपात गुंफली म्हणजे मोजदाद करणे सुकर होते; आपल्या श्रमाला आलेल्या फळांच्या रूपरंगांविषयी आणि रसाळतेविषयी आपले स्वतःचे भान जागे होते; आणि कानांनी ऐकण्यापेक्षा डोळ्यांनी वाचणे रसिकांच्या दृष्टीनेही बरे असते अशा त्रिविध उद्देशाने गीतकार आपले संग्रह प्रकाशित करीत असतात.

अशा तऱ्हेच्या संग्रहातील कवने पुष्कळदा परप्रेरित असतात. ही सर्व गीते आत्मस्फूर्तीमधून निर्माण झाल्याचा दावा स्वतः कवीही करील असे वाटत नाही. साहजिकच कवीची महत्त्वाकांक्षाही शब्दसृष्टीच्या ईश्वरांशी स्पर्धा करण्याची नसते. आपल्या गीतांचे प्रयोजन, स्वरूप आणि त्यांचा परि-णाम यांचे वेगळेपण अशा गीतकार कवीला माहीत असते. तेव्हां काव्यदृष्टया त्याच्या गीतांची सूक्ष्म विचिकित्सा करणे हा व्यर्थ खटाटोप ठरेल.

या विवेचनावरून, सुधांजलीमधील गीते निरर्थक आणि नीरस आहेत असा निष्कर्श काढण्याचे प्रयोजन नाही. कवींच्या मनाला अनादि काळापासून कंपित करणारी प्रीतिभावना ही या गीतांची स्थायी भाववृत्ती आहे. या भाव-नेचे स्वरूप एकजिनसी असूच शकत नाही. तिला अक्षरशः असंख्य छटा असतात आणि तिच्या उत्कटतेचे तपमान क्षणोक्षणी पालटणारे असते. समाधि-सदृश सुखापासून जीवनातून उठवणाऱ्या चिरवियोगापर्यंत नजर टाकली तर या रंगपट्टिकेत किती विविध रंग असू शकतात याचा अंशतः अंदाज येऊ शकेल. याशिवाय जगात व्यक्तिसौन्दर्य आणि सृष्टिसौन्दर्य यांचे मनोरम दर्शन प्रीतीभावनेचे पोषण करीत असल्याने प्रीतिगीतांना सुंदरतेची साथ संगत मिळत जाते. मर्यादित क्षितिजाच्या परीघातच हे असे असंख्य उन्मेष संभावतात आणि ते गीतरूप होतात.

गीतकाव्याच्या सामर्थ्याचीं आणि मर्यादांची जाणीव जोपासू लागल्या-वर कांही उद्बोधक गोष्टी ध्यानात येतात. छंद आणि ताल यांच्यावरती पक्की पकड, आकर्षक शब्दन्यास आणि सर्वसामान्य मनावर मोहिनी घालणारी भावसृष्टी यांची येथे महती आहे. चांगले गीत सर्व बाबतीत मध्यममार्गी

असते. बटबटीतपणा आणि अतिसूक्ष्मता दोन्ही टाळणारी भावाभिव्यक्ती त्याला उपकारक असते. शब्दकलेचा पोत, उत्प्रेक्षाशक्ती वगैरे सर्व क्षेत्रांत अशीच मधली वाट स्वीकारणे आवश्यक ठरते. संगीताची म्हणजे स्वरतालांच्या बंदिशीची जबाबदारी संगीतकाराची असते हे खरे; पण खुद्द कवीलाही मर्यादित का होईना संगीताची जाणकारी असली तरच तो चांगले गीत निर्माण करू शकेल.

सुधांजलीतील सर्वच रचनांना असे चांगुलपणाचे प्रशिस्तिपत्र देणे खोटेपणाचे होईल पण वर उल्लेखिलेल्या गुणधर्मांच्या कसोटीला उतरणारी गीते लिहिण्याइतकी सिद्धी श्री. सुधाकर कुळकर्णी प्राप्त करू शकले आहेत आणि उत्तरोत्तर त्यांचे प्रभुत्व वाढणारच आहे एवढा विश्वास या संग्रहामुळे बाळगायला हरकत नाही.

कवीला कवितेशिवाय दुसरा गुरू नसतो. स्वतःची कविता अलिप्तपणे वाचायला शिकणे आणि इतर भिन्न भिन्न प्रकारची कविता कान डोळे उघडे ठेवून वाचत राहाणे यालाच अभ्यास म्हणतात. श्री. कुळकर्णी गझल आणि जातिवृत्ते सहसा यशस्वीपणे हाताळतात; पण ऱ्हस्वदीर्घांचे भान ठेवतातच असे नाही. गीतकारांचा छंद सदोष राहण्याला संगीतकारही जबाबदार असतात असा मला वहीम आहे. संगीताच्या योजना करताना व्दिमात्रिक अक्षर एकमात्रिक उच्चारून, एकमात्रिक अक्षर प्लुत म्हणजे अतिदीर्घ उच्चारुन, तालरहित पुंज निर्माण करून, आडतालांत शब्द बसवून, गीत रचनाकाराचे बरेच दोष संगीतरचनाकार झाकू शकतात. अर्थात नसलेले दोष निर्माणही करू शकतात ही गोष्ट वेगळी ! यतिभंग, छंदःसंकर या सर्व उणीवा स्वरांच्या भरजरी झुलीखाली झाकून संगीतदिग्दर्शक रिकेटी बाळाला बाळसेदार करतात. त्यामुळे गीतकार गाफील राहू शकतो हे काही बरे नव्हे.

विविधता, गोडवा आणि सर्वसामान्यांची मने हेलावून टाकण्याची शक्ती ही सुधांजलीची बलस्थाने आहेत. माझे काम फक्त दिशेकडे बोट करण्याचे होते. पुढला प्रवास करण्यासाठी श्री. कुळकर्णी यांना उदंड तकवा आणि अखंड शिदोरी लाभो.

वसंत बापट

# ॥ सुधांजली ॥

## अनुक्रमणिका


१) नशेत रात्र जागु दे, नशेत स्वप्न रंगु दे
२) चंद्रमा हा पौर्णिमेचा आज हासे अंबरी
३) तू चांदण्यात यावे
४) सजणा, तुझी नि माझी नवप्रीत आज गाते
५) निळ्या तारकांची नभी जाग होती
६) मनात धुंद पारवा हवेत धुंद गारवा
७) मुसाफिरा गा गीत तुझे ते
८) चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला
९) कधी न जुळले सूर मनाचे
१०) आळवू नकोस दूर दीप राग तू सखे
११) रात्र पुनवेची, साथ चंद्राची
१२) प्रीतवेडी फुला साद घाली तुला
१३) रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये
१४) ते तुझे अचानक पाठ फिरवुनी जाणे
१५) सांगू कशी प्रिया मी ते गूज या कळीचे
१६) स्वप्नात तुझ्या मी येऊ कशी
१७) स्वप्न पहाते नयने मिटुनी
१८) ओठात शब्द यावे, शब्दात सूर यावे
१९) आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे
२०) सूर बसंती कोठे विरले हळव्या प्रीतवनात
२१) मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा
२२) ज्वानीला माझ्या डाळिंब फुटलय (लावणी)
२३) भल्या पहाटे चोरुन पाहुचला तुझा ग मुखडा मैना (लावणी)
२४) कशि सांगू तुला मी जडली तुजवर माया (लावणी)
२५) हिरव्या रानी हिरवी पाखर (लावणी)

२६) जवळ येशी मारून जाशी चापट माझ्या गालात (लावणी)
२७) आंबराईला बहर आला कोकिळ बोले रानात (लावणी)
२८) या शांत सागराचा रमणीय हा किनारा
२९) नीलव्योमी शुक्रतारा मंद होता जागता
३०) त्या धुंद चांदराती मी छेडिली सतार
३१) आज रानी कुणी शीळ घाली मला
३२) तू यौवनबाला भिडशी मम हृदयाशी
३३) आंधळी ही प्रीत माझी आठवांनी जागते
३४) उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी
३५) जवळ कधि येंता सख्या मी
३६) हिरव्या रानी हिरवळ दाट
३७) उगा पापण्यांनो नका जागु आता
३८) संपले हिरवे हिवाळें ओढ त्यांची आठवे
३९) भिजून येती या जलधारा
४०) सखे, सांगना, साद घालू कुणा मी
४१) झुरवुनी मना दूर असा गेलास
४२) माळून गंधवेणी दिसलीस आज तू
४३) पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका
४४) येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे
४५) हे तुझेच येती सूर
४६) चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला
४७) भुलवून दूर जाशी रतिचंचले मनास
४८) परतून रात्र गेली जुळवून प्रीतीबंध
४९) साजणा स्वप्नी येंशील का
५०) जिवलगा जाऊ नको रे दूर
५१) विश्वात आज माझ्या मी एकटाच आहे
५२) गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे
५३) साजणा सांगू कशी मी, रात्र होती रंगली
५४) हा चांद अंबरात भासे कसा उदास
५५) चंद्र धुंद चांदण्यात स्वप्न धुंद पापण्यात

५६) छेंडु नको सूर नवे धुंद मैफलीत
५७) बघतेस का अशी तू सजणी वळून मागे
५८) राजसा गेलास तू काहींच ना रे बोलता
५९) पाहुनी सखे नभात धवल चांदरात
६०, जगणें नको असे हे वाटे हवे कशास
६१) दूर तू जातेस तेव्हा स्पंदने हेलावती
६२) झाली सखें पहाट धुंद रात्र संपली
६३) संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे
६४) पौर्णिमेच्या चांदराती स्वप्न ते मी पाहिले
६५) शोधून ना मिळाला तो प्रीतीचा किनारा
६६) राजसा येंऊ नको मंदिरी पुन्हा पुन्हा
६७) सखे तुझ्या मनातले मला कसे कळायचे
६८) चांदण्याची वाट आता जिवलगा पाहू नको
६९) पाखरा तू सांगना रे जीवनी येशील का
७०) शब्द न्हाले अमृताने नाचले ओठावरी
७१) बेभान होऊनी तू गाऊ नकोस गाणें
७२) चांदणे फुलले नभी सजणी अशी जवळी रहा
७३) गेलीस तू अबोली ना ऐकताच गीत
७४) माझे मला कळेना मी भाळले कुणाला
७५) अस्तावली प्रिया ती स्वप्नातली पहाट
७६) निळचा नभात साजणा नवीन चंद्र हासतो
७७) रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा
७८) लोचनांची मूक भाषा लोचना सांगू नकोस
७९) जीवनी नाहीस तू आभाळ वाटे फाटले
८०) कळचातुनी, फुलातुनी, बसंत धुंद जागतो
८१) ना मला साहवे विरहाचे हे ऊन
८२) विसर आता चांदरात विसर प्रीतचांदणें
८३) निळचा नभात चांदणं कसे दुरुन हासते
८४) सांगू कशी प्रिया मी माझी तुला कहाणी
८५) तान्हुल्या या राजसाला आज मी जोजाविते, नीज बाळा

# नशेत रात्र जागु दे, नशेत स्वप्न रंगु दे

नशेत रात्र जागुदे, नशेत स्वप्न रंगु दे
तुझी अबोल सावली, सखे समीप येऊ दे ।।

तृषार्त आज लोचने क्षणैक पाहण्या तुला
तुलाच प्रीत सांगण्या मनात भाव जागला
रंगल्या सुरातुनी नवीन सूर येऊ दे
नशेत रात्र जागु दे, नशेत स्वप्न रंगु दे ।।१।।

फुलून साज दाविते मनात प्रीत चांदणे
दुरून ओढ लाविते तुझे प्रसन्न हासणे
नवीन आज चंद्रमा ढगात सूर छेडु दे
नशेत रात्र जागु दे, नशेत स्वप्न रंगु दे ।।२।।

उफाळती अनंत या उरात प्रीतभावना
नशेत धुंद नाचती क्षणाक्षणांत कल्पना
सदैव पापण्यातुनी तुझाच भास राहु दे
नशेत रात्र जागु दे नशेत स्वप्न रंगु दे ।।३।।

संगीत – प्रभाकर पंडित    गायक – अजित कडकडे





मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
दा. क. ....
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# चंद्रमा हा पौर्णिमेचा

तो– चंद्रमा हा पौर्णिमेचा आज हासे अंबरी
ती– राजसा रे मीलनाची साद देई अंतरी ।।

तो– पाहुनी जवळी तुला गे धुंद झाल्या या दिशा
ती– लक्ष तारे वेचुनी ही जागते वेडी निशा
तो– चांदणे शिंपु करानी मूक साऱ्या भूवरी
दोघे– चंद्रमा हा पौर्णिमेचा......

ती– लोचनी रे तूच माझ्या गोड स्वप्ने जागती
तो– प्रीतीच्या धाग्यातले ते आज नाते सांगती
ती– सप्तके छेडु मनाची सूर लागे जोवरी
दोघे– चंद्रमा हा पौर्णिमेचा......

तो– आज मोदे जागुनीया पापण्या भारावती
ती– मीलनाची ओढ आहे सांगण्या हेलावती
तो– कंपने ऐकु स्वरांची नाचुनी तालावरी
दोघे– चंद्रमा हा पौर्णिमेचा......

**संगीत – प्रभाकर पंडित**

**गायक – उत्तरा केळकर**
**– रविंद्र साठे**



# – तू चांदण्यात यावे –

तू चांदण्यात यावे, हे न कुणा कळावे
व्याकुळ लोचनानी, स्वप्नी तुला पहावे ।।

चाहूल कानी येता, मी धुंद त्यात व्हावे
नभि चंद्र दूर जाता, वाटे समीप यावे
त्या गोड भावनांचे, मी प्रेमगीत गावे
व्याकुळ लोचनांनी, स्वप्नी तुला पहावे
तू चांदण्यात यावे......।। १ ।।

काटे तुला फुलाचे, प्रीतीत न खुपावे
नाते तुझ्या कळीचे, स्वप्नात ना तुटावे
हे गूज अंतरीचे, वाटे फुलून यावे
व्याकुळ लोचनानी, स्वप्नी तुला पहावे
तू चांदण्यात यावे......।। २ ।।



**संगीत – अशोक पत्की**
**गायिका – उषा आमोणकर**

# सजणा, तुझी नि माझी नवप्रीत आज गाते

सजणा, तुझी नि माझी नवप्रीत आज गाते
स्वप्नातल्या कळ्यांना मोहून जाग येते ॥

मनी चोरपावलांनी येती कुठून आशा
मजला कशी कळेना त्यांची अबोल भाषा
धुंदीत मी तराणे तालात आज गाते
सजणा, तुझी नि माझी नवप्रीत आज गाते ॥ १ ॥

डोळ्यात जागते का ती ओढ सावल्यांची
शब्दात सांगते मी कुजबुज गोड त्यांची
विश्वात मी तुझ्या रे शिंपीत प्रीत जाते
सजणा तुझी नि माझी नवप्रीत आज गाते ॥ २ ॥

चोरून ऐकते मी ते सूर स्पंदनांचे
ओठात घोळिते मी तव नाम चंदनांचे
अनिवार मीलनाची चाहूल गंध देते
सजणा, तुझी नि माझी नवप्रीत आज गाते ॥ ३ ॥

**संगीत – प्रभाकर पंडित** **गायिका – राणी वर्मा**



## निळया तारकांची नभी जाग होती

निळ्या तारकांची नभी जाग होती
अशी ती सुगंधी सखे रात्र होती ।।

मनी कुंद झाल्या कळ्या भावनांच्या
सतारी जुळाल्या मुक्या स्पंदनांच्या
तुझ्या धुंद ओठी नवी साद होती
निळ्या तारकांची नभी जाग होती ।। १ ।।

तुझा लाजरा रेशमी स्पर्श झाला
क्षणी गुंफिल्या मी किती स्वप्नमाला
तुझी ओढ वेडी उरी धुंद होती
निळ्या तारकांची नभी जाग होती ।। २ ।।

निळ्या लोचनी मोहून प्रीत आली
मधु प्राशनाची कशी भूल झाली
तुझ्या मीलनाची नशा धुंद होती
निळ्या तारकांची नभी जाग होती ।।३।।



संगीत – केदार पंडित
प्रभाकर पंडित
गायक – रवींद्र साठे

# मनात धुंद पारवा, हवेत धुंद गारवा

तो– मनात धुंद पारवा, हवेत धुंद गारवा
ती– ढगात धुंद चांदवा, कसा दिसे नवा नवा ।।
दोघे– मनात धुंद पारवा......

तो– निळ्या नभात हासते, पिठोर शुभ्र चांदणे
ती– जुळ्या मनास भासते, तुझेच विश्व ठेंगणे
तो– निळ्या जगी, निळाच रंग
ती– वाटतो हवा हवा
दोघे– मनात धुंद पारवा......।। १ ।।

तो– तुझीच मूक स्पंदने, अबोल प्रीत ऐकते
ती– तुझाच सूर शोधुनी, तुलाच गूज सांगते
तो– स्वरात छेडुया सखे
ती– बहार प्रीतीचा नवा
दोघे– मनात धुंद पारवा......।। २ ।।

तो– नवीन रात्र जागतो, उरात स्वप्न रेखुनी
ती– सुखात मी विसावते, तुझीच प्रीत वेचुनी
तो– दुरून जाग दावितो
ती– नीलपंखी काजवा
दोघे– मनात धुंद पारवा......।। ३ ।।

**संगीत – प्रभाकर पंडित**

**गायक – उत्तरा केळकर**
**– रवींद्र साठे**



# मुसाफिरा गा गीत तुझे ते

मुसाफिरा गा गीत तुझे ते, प्रीतवनी तरू मोहरले
आठवणीने तुझ्या आज मी, आनंदे मनीं गहिवरले ।।

कुहुकुहु गाते मनीं कोकिळा देई तुला ललकारी
फुलवेलीची अबोल भाषा नाही कुणा कळणारी
एक एक तव शब्द ऐकण्या भाव उरी या आतुरले
मुसाफिरा गा गीत तुझे ते ।। १ ।।

कळयाफुलातुन वसंत वेडा हर्षभराने नाचे
प्रीतवनी मी तुला शोधिता हरपे भान मनाचे
तुझ्या स्मृतीने फुलवेलीचे एकांती मन मंतरले
मुसाफिरा गा गीत तुझे ते ।। २ ।।

नकळत येती नयनी स्वप्ने दूर दूर तू आज जरी
आस मीलनाची मधुगंधी सांग कधि होईल पुरी
अंतरिच्या आशांचे नभ रे स्वप्नकळयांनी व्यापियले
मुसाफिरा गा गीत तुझे ते ।। ३ ।।

**संगीत – प्रभाकर पंडित** **गायिका – उत्तरा केळकर**



## चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला

चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला
स्पर्शगंध तो गोड कहाणी अजुन सांगतो मला ॥

मुक्या मनाचे सूर छेडुनी आले होते तुज भेटाया
श्वासातुन मी प्रीत गुंफुनी अधिर जाहले क्षण अर्पाया
प्रथम भेटिची खूण सांगतो प्राजक्ताचा झुला
चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला ॥ १ ॥

सलज्ज जवळी तुझ्या येऊनी गुज वाचले नयने मिटुनी
करपाश तुझे गळ्यात पडता आनंदाने गेले भिजुनी
तो क्षण येता मधुमीलनाचा चंद्र नभी लाजला
चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला ॥ २ ॥

खुदकन् हसले नीलम तारे स्पर्शुन गेले सावळ वारे
धुंद नाचता मोर मनी रे अर्पुन गेले मी तुज सारे
नाजुक वेडया दोन मनांचा असा रास रंगला
चांदण्यातली भेट जिवलगा आठवते का तुला ॥ ३ ॥

**संगीत – प्रभाकर पंडित** **गायिका – राणी वर्मा**



## कधि न जुळले सूर मनाचे . . .

कधि न जुळले सूर मनाचे
कधि न जुळली प्रीत
तुजविण जुळले रे हे गीत ।।

निशिगंध मनी फुलुनी सरला
स्पर्शसुखाचा गंध न कळला
जगण्यासाठी केवळ उरली
आठवणींची मीत
तुजविण जुळले रे हे गीत ।। १ ।।

मूक पाखरु वृथाच झुरले
स्वप्न तयाचे मनात विरले
जुळल्याविण ते धागे तुटले
काय जगाची रीत
तुजविण जुळले रे हे गीत ।। २ ।।

आज मनाच्या क्षितिजावरती
सांज दाटली अवती भवती
आळविते मी वीणेवरती
विरहाचे संगीत
तुजविण जुळले रे हे गीत ।। ३ ।।



संगीत– प्रभाकर पंडित
गायिका- उत्तरा केळकर

## आळवु नकोस दूर दीपराग तू सखे

आळवु नकोस दूर दीपराग तू सखे
गुंतवु नको स्मृतीत मूक जीव हा सखे ।।

विरले ते प्रेमगीत आर्त भावनांचे
उरले आता न मुक्त हास्य चांदण्यांचे
काजळली तुजविणाच धुंद पौर्णिमा सखे
आळवु नकोस दूर दीपराग तू सखे ।। १ ।।

चैत्रपक्षी भिरभिरुनी दूर दूर पांगले
मूकभाव परि त्यांचे लोचनात थांबले
प्रीतपंखी मनमयुर क्षीण जाहले सखे
आळवु नकोस दूर दीपराग तू सखे ।। २ ।।

वेड लाउनी गेले शब्द तुझे लाजरे
दाटुनी मनात गंध व्यर्थ आज पाझरे
आस झुरे एकटीच मीलनाविणा सखे
आळवु नकोस दूर दीपराग तू सखे ।। ३ ।।

**संगीत- प्रभाकर पंडित** **गायक- अजित कडकडे**



## रात्र पुनवेची, साथ चंद्राची ...

तो– रात्र पुनवेची, साथ चंद्राची
गीत गाऊ सखे चांदण्यात ।।
ती– रात्र पुनवेची, साथ चंद्राची
गीत गाऊ सख्या चांदण्यात ।।
तो– स्पर्शांवाचुन मनी मोहरली
वेल गहिऱ्या तुझ्या यौवनाची
ती– अंगअंगातुनी प्रीत फुलली
जाग देई मधुमीलनाची
तो– रात्र प्रीतीची, ओढ स्पर्शाची
स्वैर नाचे ब्रिलोरी मनात
दोघे– रात्र पुनवेची............।। १ ।।

तो– पापण्यांच्या कळ्यातुन फुलली
गोड स्वप्ने सुखाच्या क्षणांची
ती– चांदण्यांच्या मळ्यातुन स्फुरली
भावमाला सख्या ही स्वरांची
तो– गंध स्पर्शाचा, साज प्रीतीचा
आज खेळे फुलोरा मनात
दोघे– रात्र पुनवेची............।। २ ।।

**संगीत– अशोक पत्की**

**गायक– प्रभाकर ब्रम्हे**
**नीला रवींद्र**



# प्रीत वेडी फुला, साद घाली तुला

प्रीत वेडी फुला, साद घाली तुला
चंद्र हासे नभी, भास होई मला ॥

ओंजळीने सखे, शिंपुया चांदणे
गीत हे प्रीतीचे, गाऊया साजणे
गंध स्पर्शांतला, वेड लावी मला
चंद्र हासे नभी, भास होई मला ॥ १ ॥

प्रीतीच्या तू फुला, चंद्र लाजे तुला
चांदण्यांचा सखे, माळुया ग झुला
मीलनाची घडी, आज वाटे मला
चंद्र हासे नभी, भास होई मला ॥ २ ॥

प्रीतीच्या पाखरा, एक तू आसरा
जागतो लोचनी, भाव तो लाजरा
आंधळ्या प्रीतीची, ओढ लागे मला
चंद्र हासे नभी भास होई मला ॥ ३ ॥



संगीत— अशोक पत्की
गायक—प्रभाकर ब्रम्हे

# रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये

रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये
गीत हे विरही मनाचे ऐकण्या श्वासात ये ।।

मोरपंखी पाखरु हे आज एकांती झुरे
आठवांची साथ वेडी मात्र ती आता उरे
मूक झाल्या भावनाना स्पर्शुनी पंखात ये
रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये ।। १ ।।

प्रेमवेडी मी विराणी शिंपिते मी आसवे
सावल्यांच्या चित्ररेखा दूर गेल्या तुजसवे
दुःख ते दाटुन सांगे साजणा वृंदात ये
रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये ।। २ ।।

लोचनी या आज विझले पंचप्राणांचे दिवे
जीवनी अंधार छाया ना मला ती साहवे
साजणा, ती साद देण्या माझिया विश्वात ये
रेशमाचे ते दुवे तू जोडण्या स्वप्नात ये ।। ३ ।।



**संगीत– यशवंत देव**
**गायिका– मंगला नाथ**

# ते तुझे अचानक पाठ फिरवुनी जाणे

ते तुझे अचानक पाठ फिरवुनी जाणे
कंठात विराले अधुरे जीवन गाणे ।।

गुलमोहर फुलुनी गेले ते विखरुन
स्वप्नांच्या वाटा गेल्या त्या हरपून
संपले हिवाळे केवळ त्यांना स्मरणे
कंठात विराले अधुरे जीवन गाणे ।। १ ।।

मखमली सूर ते गेलीस तू छेडुन
जुळविले प्रीतीचे बंध तया समजुन
पाखरू मनाचे झुरते केविलवाणे
कंठात विराले अधुरे जीवन गाणे ।। २ ।।

स्वप्नांचे मोती गेलीस तू उधळुन
प्राणांच्या ज्योती गेलीस तू विझवुन
अंधारी जीवन केवळ आता जगणे
कंठात विराले अधुरे जीवन गाणे ।। ३ ।।

**संगीत– अशोक पत्की**
**गायक– प्रभाकर ब्रम्हे**



# सांगू कशी प्रिया मी...

सांगू कशी प्रिया मी, ते गूज या कळीचे
स्वप्नात रेखिले मी, नाते तुझे नि माझे ॥

स्पर्शात बोलते ती, चाहूल मीलनाची
कुंजात शोधिते मी, पाउलवाट माझी
भुलवून दूर नेते, हे पाखरु मनाचे
स्वप्नात रेखिले मी, नाते तुझे नि माझे ॥ १ ॥

धुंदीत ऐकते मी, झंकारल्या सतारी
ओठात घोळते मी, माझीच एकतारी
उमलून गंध देते, हे फूल भावनांचे
स्वप्नात रेखिले मी, नाते तुझे नि माझे ॥ २ ॥

डोळ्यात वाचते मी, प्रतिमा तुझ्या मनाची
शब्दात सांगते मी, ही मीत पाखराची
जुळवून प्रीत जाते, हे बंध रेशमाचे
स्वप्नात रेखिले मी, नाते तुझे नि माझे ॥ ३ ॥

**संगीत– अशोक पत्की** **गायिका– नीला रवींद्र**



# स्वप्नात तुझ्या मी येऊ कशी

स्वप्नात तुझ्या मी येऊ कशी
जुळल्याविण नाते सांगू कशी ।।

मन्मंदिरी तव प्रतिमा हसते
नाव तुझे मी अधरी जपते
चाहुल तव रे दुरुनी कळते
हे गूज तुला मी सांगू कशी ।। १ ।। स्वप्नात......

बहर प्रीतीचा मनी मोहरे
गंध सांडते बसंत वारे
धुंदीत गाते मी हर्षभरे
या स्वर्गसुखा मी वेचु कशी ।। २ ।। स्वप्नात......

रात्रंदिन मी माझी नुरते
बिलगुन आशा मनात झुरते
स्पर्शाविण फुलवेल बहरते
ही भावफुले मी वाहु कशी ।। ३ ।। स्वप्नात......

**संगीत– गायिका– मधुबाला चावला**



## स्वप्न पहाते नयने मिटुनी

स्वप्न पहाते नयने मिटुनी
आज प्रिया रे तुज आठवूनी ॥

भाव मनातिल अधरी रुळती
सप्त स्वराविण स्वरहि कळती
आठवणींचे मूक पाखरु
गाणे गाते भिर भिर फिरूनी
स्वप्न पहाते नयने मिटुनी ॥ १ ॥

एकांतातिल दिधल्या शपथा
गंध पाझरे त्यांना स्मरता
दोन मनाची मंजुळ वीणा
छेडि तराणे अधिर होऊनी
स्वप्न पहाते नयने मिटुनी ॥ २ ॥

भास जागतो मधुमासाचा
अर्थ सांगतो स्पर्शसुखाचा
प्रीत कळ्यातुन, प्रीत फुलातुन
पराग धावे मोहित होऊनी
स्वप्न पहाते नयने मिटुनी ॥ ३ ॥

**गायिका- संगीत- मधुबाला चावला**



## ओठात शब्द यावे...

ओठात शब्द यावे, शब्दात सूर यावे
सूरात गीत यावे, गीतात तूच यावे ॥

कुंजात भावनांच्या मकरंद मंद यावा
प्राशून कैफ त्याचा हा जीव धुंद व्हावा
भ्रमरास पाहता मी लाजून चूर व्हावे
ओठात शब्द यावे, शब्दात सूर यावे ॥ १ ॥

आभाळ चांदण्यानी वाटे फुलून यावे
मनभोर त्या क्षणीं तू मजला समीप घ्यावे
प्रीतीतल्या सुखाने वाटे भिजून जावे
ओठात शब्द यावे, शब्दात सूर यावे ॥ २ ॥

जागेपणीच माझ्या डोळ्यात स्वप्न यावे
झंकार भावनांचे स्वप्नात धुंद व्हावे
हे गूज या कळीचे उमलून आज यावे
ओठात शब्द यावे, शब्दात सूर यावे ॥ ३ ॥

**संगीत– केदार पंडित**
**गायिका– संजिवनी जोशी**



# आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे

आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे
प्रीतीचा नवीन सूर अंबरात जाउ दे ।।

ओथंबुन सांडतात प्रीतदाटल्या सरी
दरवळे तयांचा मधुगंध चंदनापरी
मोहरल्या प्रीतीचा बहर मुक्त खेळु दे
आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे ।। १ ।।

सूर छेडितो नभात आज पूर्ण चंद्रमा
साज दाविते मनास श्वेतपंखी पौर्णिमा
ही अशी अमोल घडी स्वप्नधुंद राहु दे
आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे ।। २ ।।

भारल्या मनात आज स्वप्न गोड हासते
लोचनी सखे तुझ्या नवीन विश्व भासते
प्रीतीचा वसंत हा सदा फुलून हासु दे
आज सखे धुंद गीत चांदण्यात गाउ दे ।। ३ ।।



# सूर बसंती कोठे विरले...

सूर बसंती कोठे विरले हळव्या प्रीतवनात
सख्या मी झुरते आज मनात ।।

स्वप्न फुलांचा मोहर सरला
मधुमासाचा गंध न उरला
शिल्प प्रीतीचे कोसळले रे
नयनांच्या सज्जात ।। १ ।। सख्या मी......

एकाकीपण नको वाटते
संध्याछाया मनी दाटते
आठवणींचे काहूर नाचे
विरहाच्या कैफात ।। २ ।। सख्या मी......

रात्रंदिन हे झुरे पाखरु
दु:ख मनाचे कसे आवरु
बोल व्यथेचे गीत गुंफती
भैरवीच्या रागात ।। ३ ।। सख्या मी......



# मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा

मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा
ती स्पर्शभेट होता फुलला मनी पिसारा ॥

भिजल्या तशा क्षणांत अंगी शहारले मी
ती दृष्टभेट होता रोमी थरारले मी
परी होऊनी उडाले गगनात मी भरारा
मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा ॥ १ ॥

गंधाळ भावनांची चाहूल गोड आली
डोळ्यात पाखरांची किलबिल गोड झाली
भासे समीप आला प्रीतीतला किनारा
मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा ॥ २ ॥

नजरेतल्या सुखाची कळली मधुर भाषा
सौख्यातल्या क्षणांची फुलली मनात आशा
सुख चिंतनी मिळाला छायेतला निवारा
मी ओलिंचिब असता केला कुणी इशारा ॥ ३ ॥



## ज्वानीला माझ्या डाळिंब फुटलय . .

ज्वानीला माझ्या डाळिंब फुटलय
गुलाब फुललाय गालात
राया भेटुन जा माझ्या महालात ॥

तुझ्यासाठी हा जीव माझा जळतो
तुझ्या प्रीतीचा डाव मला कळतो
जरा येऊन जा, हळु काढुन जा, काटा ज्वानीचा रुतलाय पायात
राया भेटुन जा माझ्या महालात ॥ १ ॥

तुझ्या नजरेला लावीन नजर
गोड कानात सांगीन खबर
हात घेऊन हातात, ओठ देऊन ओठात, जरा विसावा घेईन बाहूत
राया भेटुन जा माझ्या महालात ॥ २ ॥

तुझ्या भेटीचा लागलाय ध्यास
माझ्या ज्वानीचा पेटलाय गॅस
जवळ येऊन तुझ्या, करीन थोडी मजा, तुला ओढुन घेईन पदरात
राया भेटून जा माझ्या महालात ॥ ३ ॥



संगीत– प्रभाकर पंडित
गायिका– पुष्पा पागधरे

# भल्या पहाटे चोरुन पाहचला तुझा ग मुखडा मैना

भल्या पहाटे चोरुन पाहचला तुझा ग मुखडा मैना
माझ्या जिवाची झाली ग दैना ॥

गोऱ्या अंगाची पाहुन काया, कशी जडली तुझ्यावर माया
जीव वेडा मुका, तुझ्यासाठी भुका,
काही केल्या उगी मुळी –हायना
माझ्या जिवाची झाली ग दैना ॥ १ ॥

तुझ्या ज्वानीच पीक उभार, सपनी येऊन करी बेजार
वाटे लावून हात, जावे काटून रात
विच्छा होईल पुरी का मैना
माझ्या जिवाची झाली ग दैना ॥ २ ॥

तुझ्या गालाची पाहून खळी, झालो मैना तुझा मी बळी
मस्ती भरली अंगात, ज्वानी रंगे रंगात
मला जवळ घेशील व्हंयना
माझ्या जिवाची झाली ग दैना ॥ ३ ॥

बाशिंग बांधुन येईन दारी,
तुझ्यासंग मी करीन सवारी
हाती घेऊन हात, जाऊन माळरानात,
नाव ठेवीन डोंगर मैना
माझ्या जिवाची झाली ग दैना ॥ ४ ॥



**गायक– जयवंत कुळकर्णी**
**संगीत– प्रभाकर पंडित**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## कशि सांगु तुला मी जडली तुजवर माया

कशि सांगु तुला मी जडली तुजवर माया
रात्रंदिन तुजला आठविते मी राया ॥

आंबराई फुलली हिरवी हिरवी गार
शेतातुन फुलले हिरवे पीक उभार
मी आले चोरुन आज तुला भेटाया
रात्रंदिन तुजला आठविते मी राया ॥ १ ॥



भरजरी शालु मी नेसुन आले तंग
गोऱ्या दंडावरती सजला बाजुबंद
रेशमी तनुवर पडुदे तुझी रे छाया
रात्रंदिन तुजला आठविते मी राया ॥ २ ॥

बघु मळचात बसुनी मावळतीचे तारे
विसरु एकांती पाश मनाचे सारे
कैफात लुटुया दोन जिवांची काया
रात्रंदिन तुजला आठविते मी राया ॥ ३ ॥

संगीत– अशोक पत्की
गायिका– शकुंतला कांबळे

# हिरव्या रानी, हिरवी पाखरे, गाती पारावरी

हिरव्या रानी, हिरवी पाखरे, गाती पारावरी
नजर तुझी राया माझ्या झाडावरी ।।

ही हिरवी शेते दिसती सुंदर गार
अंगी कैफ ज्वानीचा करितो मज बेजार
मी माळ्याची लेक, आहे लाखात एक, मी नाचते तालावरी
नजर तुझी राया माझ्या झाडावरी ।। १ ।।

करु नको लगट अशी गोऱ्या या अंगाशी
दावु नको जात तुझी खेळुन या पदराशी
गोल गाली गुलाब, लाल लाली ओठात, मी दिसते राणीपरी
नजर तुझी राया माझ्या झाडावरी ।। २ ।।

छळु नको उगीच तू मजला वेड्यावाणी
मागु नको माझी ही काया गोजिरवाणी
माझ्या पिरतीची वाट, दावते ज्वानीचा थाट, मी झुरते तुझ्यावरी
नजर तुझी राया माझ्या झाडावरी ।। ३ ।।

**संगीत– अशोक पत्की** **गायिका– संध्या राव**



## जवळ येशी मारुन जाशी चापट माझ्या गालात

जवळ येशी, मारून जाशी, चापट माझ्या गालात
तुझ्या इष्काचा रंग सांगते चाळ बांधुनी पायात ।।

डावा डोळा, लवतोय खुळा, झोप मला बाई येईना
शपथ तुझी मी घेऊन सांगते जवळ मला कोणी घेईना
स्वप्नात येशी, भेटून जाशी, शिपून पाणी दारात
तुझ्या इष्काचा रंग सांगते चाळ बांधुनी पायात ।। १ ।।

रंग माझा गोरा, चल मनमोरा, खेळ खेळुया प्रीतीचा
हात ठेऊनी छातीवरती दीप लावुया वातीचा
झटकन् येशी, करून जाशी, मस्ती सुखाची कैफात
तुझ्या इष्काचा रंग सांगते चाळ बांधुनी पायात ।। २ ।।

तू माझा राजा, मी तुझी राणी, तोंडानं पाज मला पाणी
राजीखुशीने देते हाती गुलाब अत्तरदाणी
धावत येशी, जवळ घेशी, ओढुन बाहुपाशात
तुझ्या इष्काचा रंग सांगने चाळ बांधुनी पायात ।। ३ ।।

संगीत– प्रभाकर पंडित

गायिका– पुष्पा पागधरे



# आंबराईला बहर आला कोकिळ बोले रानात

आंबराईला बहर आला कोकिळ बोले रानात
तुझ्या प्रीतीचा रंग कोणता सांग सख्या माझ्या कानांत ॥

सांज सकाळी, वेळी अवेळी, येशी माझ्या शेतात
लाज वाटते, आग पेटते, ज्वानी भरलिया अंगात
भान विसरते, गोल नाचते, रोज तुझ्या मी तालात
तुझ्या प्रीतीचा रंग कोणता सांग सख्या माझ्या कानांत ॥ १ ॥

पिऊन जाशी अमृत माझ्या लाल गुलाबी ओठाचे
मारून जाशी टिचकी गाली चुंबन घेऊन पोटाचे
मस्तीत मी रे धुंद होऊनी गाणे गाते कैफात
तुझ्या प्रीतीचा रंग कोणता सांग सख्या माझ्या कानांत ॥ २ ॥

जवळ येऊन घे रे मजला अपुल्या बाहूपाशात
देह गोजिरा माझा सजला लोभस वेडचा मदनात
आज खेळुया खेळ नशेचा प्रेमाचा रे दोघात
तुझ्या प्रीतीचा रंग कोणता सांग सख्या माझ्या कानांत ॥ ३ ॥

**संगीत– प्रभाकर पंडित** **गायिका– पुष्पा पागधरे**



## या शांत सागराचा रमणीय हा किनारा

तो– या शांत सागराचा, रमणीय हा किनारा
ती– प्रीतीतल्या उबेचा घेऊ इथे निवारा ।।

तो– गंधाळली हवा ही गोंजारिते मनास
ती– धुंदावली कळी ही अनिवार मीलनास
तो– व्याकुळ भावपक्षी करिती सखे इशारा ।। १ ।।

तो– नक्षत्र तारका या, गुज सांगती नभास
ती– लाजुन चंद्र हासे पाहुन या कळीस
तो– प्राशुन गंध सारा फुलवु सखे फुलोरा ।। २ ।।

तो - चल, बंध रेशमाचे जुळवु इथे मनात
ती– वेचुन स्वप्नमोती उधळु निळ्या नभात
तो– मनमोर धुंद नाचे झंकारुनी पिसारा ।। ३।।



# नील व्योमी शुक्रतारा मंद होता जागता

नील व्योमी शुक्रतारा मंद होता जागता
अंतरी तो प्रीतवारा धुंद होता वाहता ॥

दशदिशाना जाग होती प्रीतीच्या गर्भातली
रोमरोमी ओढ होती रेशमी स्पर्शातली
सूर ते जुळले तुझी चाहूल कानी लागता
अंतरी तो प्रीतवारा धुंद होता वाहता ॥ १ ॥

भाव होते लाजणारे स्वप्न होते लोचनी
ताल होते नाचणारे बोल होते स्पंदनी
गुंतल्या जीवातला तो श्वास होता धावता
अंतरी तो प्रीतवारा धुंद होता वाहता ॥ २ ॥

तू तशी येताच जवळी मी सुखाने नाहलो
प्राशुनी मधुगंध ओठी मी उरी धुंदावलो
भारलेल्या त्या क्षणांची गोड झाली सांगता
अंतरी तो प्रीतवारा धुंद होता वाहता ॥ ३ ॥



## त्या धुंद चांदराती मी छेडिली सतार

त्या धुंद  चांदराती मी छेडिली सतार
झंकारल्या स्वरांची फुलली सखे बहार ।।

स्पर्शून प्रीत गेली गंधाळ त्या क्षणांत
मोहून धुंद झालो ओढाळ या मनात
स्वप्नातल्या कळ्यानी केला उरी करार
झंकारल्या स्वरांची फुलली सखे बहार ।। १ ।।

स्वप्नील भावपक्षी पंखाविणा उडाले
हितगूज गोड त्यांचे शब्दाविणा कळाले
नक्षत्र तारका त्या हसल्या नभी अपार
झंकारल्या स्वरांची फुलली सखे बहार ।। २ ।।

रेखून रात्र गेली ते स्वप्न पारव्याचे
छेडून प्रीत गेली ते सूर या मनाचे
जागून चांदव्याने केला नभी विहार
झंकारल्या स्वरांची फुलली सखे बहार ।। ३ ।।



## आज रानी कुणी शीळ घाली मला

आज रानी कुणी शीळ घाली मला
नाव त्याचे मनी आठवे ना मला ।।

लाज वाटे कशी साद कानी पडे
ऐकता सूर मी शब्द ओठी अडे
आंधळ्या प्रीतीचा भास होई मला
आज रानी कुणी शीळ घालीं मला ।। १ ।।

धुंद होता मनी रंग गाली चढे
रेखिले स्वप्न ते अंतरी का दडे
भावनांचा मृदु स्पर्श होई मला
आज रानी कुणी शीळ घाली मला ।। २ ।।

गंध तो प्रीतीचा माळरानी फुले
शीळ येता क्षणी जीव वेडा झुले
मीलनाची घडी हीच वाटे मला
आज रानी कुणी शीळ घाली मला ।। ३ ।।



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७६९
दा. क. २३८५५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# तू यौवनबाला...

तू यौवनबाला
भिडशी मम हृदयाशी
अन् उधळित येशी
स्वप्नफुलांच्या राशी ॥

स्पर्शात उमलती
गुलाब ते प्रीतीचे
भय ना वाटे कधि
त्या कोमल काटचांचे ॥

मज वेड भासते
तव लोभस नयनांचे
हृदयास स्पर्शिती
कंपित स्वर प्रणयाचे ॥

तव स्मित वृष्टीने
फुलते सारी सृष्टी
अन् शब्दफुलांची
होते तुजवर वृष्टी ॥

तू यौवनबाला
मज लागे तव छंद
हृदयात जुळवितो
तव प्रीतीचे बंध ॥



# आंधळी ही प्रीत माझी आठवांनी जागते

आंधळी ही प्रीत माझी आठवांनी जागते
अंतरी जपली व्यथा मी आसवानी सांगते ॥

प्रीतवेडे चैत्र वारे दूर गेले ते कुठे
गंध त्याचा व्यर्थ वाहे जाग स्वप्नाना उठे
सूर विरहाचे मनाची जीर्ण वीणा छेडिते
अंतरी जपली व्यथा मी आसवानी सांगते ॥ १ ॥

चंद्रमा तो पौर्णिमेचा मावळे या जीवनी
आठवांचा स्पर्श होता वादळे येती मनी
हिरवळीच्या मूक वाटा मी वृथा त्या धुंडिते
अंतरी जपली व्यथा मी आसवानी सांगते ॥ २ ॥

संपले नाते क्षणांचे गंध त्याचा का उरे
आज गंधातुन वेडा जीव एकांती झुरे
मूक हळव्या भावनांच्या पाकळ्या मी गुंफिते
अंतरी जपली व्यथा मी आसवानी सांगते ॥ ३ ॥



## उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी

उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी
वृथा थांबती आठवें आज दारी ।।

मुके भावपक्षी कुठे दूर गेले
व्यथा सांगती ग सखे नेत्र ओले
शिणाली आता प्रीतपंखी भरारी
उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी ।। १ ।।

वसंतातले भावस्पर्शी हिवाळे
खुळी ओढ त्यांची मनाशी झळाळे
उरी बोचल्या यौवनाच्या कटयारी
उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी ।। २ ।।

आता एकटा राहिलो मी किनारी
कळा दाटुनी झोंबती ग जिव्हारी
घुमे आसमंती तुझी एकतारी
उगा छेडिल्या मी मनाच्या सतारी ।। ३ ।।

**गायक– भूमानंद बोगम**



## जवळ कधि येता सख्या मी...

जवळ कधि येता सख्या मी, दूर तू जातोस का
शोधुनी परि तो मिळेना सूर प्रणयी कोणता ।।

वेचुनिया माळिले मी पुष्पमालांचे झुले
आज का तालात वेडी प्रीत ही माझी डुले
भास हा जागेपणी का संथ येई मागुता
जवळ कधि येता सख्या मी, दूर तू जातोस का ।। १ ।।

अक्षरानी रेखिले मी स्वप्न माझे देखणे
भारल्या माझ्या मनी का मुक्त हासे चांदणे
भावभोळ्या प्रीतीची या, ना कळे ती सांगता
जवळ कधि येता सख्या मी, दूर तू जातोस का ।। २ ।।

गुंफिले नाजुक नाते सांग सखया कोणते
मीलना वाचुन नयनी गूज माझे बोलते
ओढ ती बिलगे मनाला क्षणी तुला मी पाहता
जवळ कधि येता सख्या मी, दूर तू जातोस का ।। ३ ।।



# हिरव्या रानी हिरवळ दाट

हिरव्या रानी, हिरवळ दाट
हितगुज सांगे पाऊलवाट ॥

आंबराई ती हिरवी गार
विसावे त्यात दूर शिवार
इशारे देती नदीचे कांठ
हितगुज सांगे पाऊलवाट ॥ १ ॥

फुले डौलाने पारिजात
गंधुन टाकी आसमंत
उभे माडाचे काळे सावट
हितगुज सांगे पाऊलवाट ॥ २ ॥

दंवभरल्या मातीची शाल
तृणे निजली त्यात खुशाल
लक्ष वेधते पाणंद दाट
हितगुज सांगे पाऊलवाट ॥ ३ ॥

झाडात लपे कौलारू घर
स्वागता उभे विशाल द्वार
तेथे मायेचे वाहती पाट
हितगुज सांगे पाऊलवाट ॥ ४ ॥



# उगा पापण्यांनो नका जागु आता

उगा पापण्यांनो नका जागु आता
पुन्हा स्वप्न वेडे नका पाहु आता ।
जरि दूर गेली क्षणाचीच नाती
उरी बोल त्यांचे व्यथा सांगताती
कुणा दुःख माझे नका सांगु आता
उगा पापण्यांनो नका जागु आता ।। १ ।।

स्मृती वेचिता सांज झाली मनाची
सुखा शोधिता भूल झाली क्षणांची
व्यथेचा किनारा नका दावु आता
उगा पापण्यांनो नका जागु आता ।। २ ।।

न चाहूल ये आज त्या पावलांची
न आता उरे ओढ त्या सावल्यांची
मुक्या या मनाची नका वाचु गाथा
उगा पापण्यांनो नका जागु आता ।। ३ ।।



## संपले हिरवे हिवाळे ओढ त्यांची आठवे

संपले हिरवे हिवाळे ओढ त्यांची आठवे
लोचने भिजवून जाती मूक वेडी आसवे ।।

सावल्या सरल्या सुखाच्या दुःख ते ना साहवे
पाकळ्या सुकल्या फुलाच्या फूल ते ना पाहवे
गंधवेड्या त्या क्षणांचे आज सरले गारवे
लोचने भिजवून जाती मूक वेडी आसवे ।। १ ।।

चैत्रपक्षांचे सखे जे सूर कानीं ऐकिले
गोड स्वप्नांचे कुठे ते दूर गेले काफिले
जाग देती आठवांचे प्रीतपंखी काजवे
लोचने भिजवून जाती मूक वेडी आसवे ।। २ ।।

वाळल्या पुष्पात देठी जीव एकांती झुरे
मीलनाची जीवघेणी ओढ आता ना उरे
वादळे आता निमाली साजणे कालासवे
लोचने भिजवून जाती मूक वेडी आसवे ।। ३ ।।



# भिजून येती या जलधारा

भिजून येती या जलधारा शामल मेघातुनी
श्रावण डोले हिरव्या रानी पानापानातुनी ।।

निसर्ग सुंदर सजे रेशमी हरितवस्त्र नेसुनी
रंग दावितो नवमासाचे रुप नवे घेऊनी
निरोप देई आषाढाला प्रेमें आलिंगुनी
श्रावण डोले हिरव्या रानी पानापानातुनी ।। १ ।।

आतुर पक्षी वाट पाहती अपुल्या घरटचातुनी
वर्षाऋतुची चाहूल देती साज नवा पाहुनी
सूर मारूनी जाती नभी संदेश नवा घेऊनी
श्रावण डोले हिरव्या रानी पानापानातुनी ।। २ ।।

लज्जित होती वनतरूवेली धारानी भिजुनी
पर्णफुलांच्या मागे लपुनी डुलती आनंदुनी
हरित तृणातुन अवखळ वाहे समीर धुंदाउनी
श्रावण डोले हिरव्या रानी पानापानातुनी ।। ३ ।।



# सखे, सांगना, साद घालु कुणा

सखे  सांगना, साद घालु कुणा मी
उरी दाटले दु:ख सांगु कसे मी   ।।

वृथा थांबतीं कारवे आठवांचे
मना सांगती गूज वेडचा क्षणांचे
हवा वाटतो गंध शोधु कुठे मी
सखे, सांगना, साद घालु कुणा मी ।। १ ।।

न कोठे आता धावती मृगजळे ती
खुणा दाविती आंधळी वाट त्यांची
व्यथा मूक ही आज सांगू कशी मीं
सखे, सांगना, साद घालु कुणा मी ।। २ ।।

जगी पारका मी मना भास होई
सुखाच्या क्षणाची सखे सांज होई
दुवे रेशमी आज जोडू कसे मी सखे
सांगना, साद घालुकुणा मी ।।३।।



# झुरवुनी मना दूर असा गेलास

झुरवुनी मना दूर अशी गेलीस
तू सांग प्रिये मी साहु कसा वनवास ।।

त्या खुणा प्रीतीच्या दिसती आज भकास
गगनात चांदण्या हसती आज उदास
संपला आता मोरपिशी मधुमास
तू सांग प्रिये मी साहु कसा वनवास ।। १ ।।

त्या शुष्क भासती हिरव्या पाऊलवाटा
बोचतो शरापरी त्यांचा कोमल काटा
आठवे मनी फसवा मृगजळ भास
तू सांग प्रिये मी साहु कसा वनवास ।। २ ।।

ताटवे गुलाबी सुकती कुंजवनात
आसवे पोरकी झरती या नयनात
चुंबिती स्मृती गंधाविण कमळास
तू सांग प्रिये मी साहु कसा वनवास ।। ३ ।।



## माळून गंधवेणी दिसलीस आज तू

माळून गंधवेणी दिसलीस आज तू
लावण्य चंद्रकांता मज भासलीस तू ॥

तव साज पाहुनी मी बेभान जाहलो
माझ्याच प्रीतीच्या मी कुंजात धावलो
हलकेच साद देता, ना थांबलीस तू
माळून गंधवेणी दिसलीस आज तू ॥ १ ॥

धुंदीत लोचनानी मधुस्वप्न पाहिले
गुजगान प्रीतीचे मी तालात गाइले
मनभोर चांदण्याचा फुलला मनी ऋतु
माळून गंधवेणी दिसलीस आज तू ॥ २ ॥

व्याकुळ भावपक्षी मोहून नाचले
हितगुज मी तयांचे चोरून ऐकले
पंखात पापण्यांच्या लपलीस का ग तू
माळून गंधवेणी दिसलीस आज तू ॥ ३ ॥



# पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका

पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका
दाटलेल्या भावनांची कंपने जाणू नका ॥

अंतरी गोंजारती मज मोरपंखी त्या स्मृती
सांगते हितगुज त्यांचो सप्तरंगी आकृती
साथ त्यांची स्वप्नगंधी दूर ती लोटू नका
पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका ॥ १ ॥

भासते जरि दूर गेली यौवनाची पालवी
जागते अजुनी तिची ती ओढ वेडी लाघवी
भावस्पर्शी या मनाची तलखली ऐकू नका
पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका ॥ २ ॥

लोचने भारून गेले मृगजळांचे कारवे
व्यर्थ त्याना शोधिती अजुनी मनाचे पारवे
मूक झाल्या सप्तकाचे सूर ते शोधू नका
पापण्यांनो आसवांना आसरा देऊ नका । ३ ॥



# येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे

येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे
गुंफुनी तू शब्दमोती गा पुन्हा ते प्रीतगाणे ।।

थांबवू कोठे कसे मी आठवांचे कारवे
अंतरी घुमती मुके ते भावनांचे पारवे
आज मी छेडु कसे विरहात प्रीतीचे तराणे
येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे ।। १ ।।

अस्त झाला पौर्णिमेचा आज वाटे जीवनी
हा उन्हाळा यातनांचा दाट दाटे या मनी
पाखरू सादाविणा गे आज झुरते दीनवाणे
येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे ।। २ ।।

वेचुनी क्षण ते सुखाचे दूर गेल्या सावल्या
याद त्यांची मात्र येता पापण्या ओलावल्या
लाडके दावून जा गे ते तुझे लटके बहाणे
येउनी स्वप्नात माझ्या सांग ते सारे उखाणे ।। ३ ।।



## हे तुझेच येती सूर

हे तुझेच येती सूर
भारिती सखे मनमयूर
गोंजारुनी जाती दूर
लाविती गोड हुरहुर ।।

दरवळे मनीं निशिगंध
गंधात कळी तू धुंद
प्रणयात रेशमी बंध
गुंफिते मनी काहूर ।। हे तुझेच...... ।। १ ।।

धुंदाउन येती स्वप्ने
गाऊन प्रीतीचे गाणे
मन होई प्रेमदिवाणे
मीलनास त्या आतुर ।। हे तुझेच...... ।। २ ।।

ही लय गंधार सुरांची
अंबरात जाई विरुन
बेभान होऊनी नाचे ।
झंकारुन पंख मयूर ।। हे तुझेच... ।। ३ ।



## चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला

चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला
भावनांच्या ओंजळीने शिंपितो प्रेमे तुला ॥

नाचतो चतुरंग वेडा या मनीं धुंदाऊनी
प्राशितो मधुगंध सारा लाजऱ्या स्पर्शातुनी
रेशमी सहवास गहिरा भूल का घाली मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ १ ॥

अंतरी गोंजारती स्वप्नील भोळ्या भावना
सांगती हितगुज त्यांना गंधवेड्या कल्पना
चैत्रपक्षांच्या स्वरांची ओढ का लागे मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ २ ॥

आसमंती दूर जाती या मनाचे पारवे
मूक त्याना साद देती भावनांचे कारवे
लोचनी फसव्या मृगाचा भास का होई मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ ३ ॥



## भूलवून दूर जाशी रतिचंचले मनास

भुलवून दूर जाशी रतिचंचले मनास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।।

येता समीप तू ग, मिळतो सखे निवारा
स्वप्नील भावनांचा फुलतो मनी पिसारा
नक्षत्र तारकांचा विळखा पडे नभास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।। १ ।।

सुखवून दूर जाती स्पर्शात गंध वारे
तो गंध प्राशुनी मी रचिले किती मनोरे
तव साज यौवनाचा गोंजारितो मनास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।। २ ।।

घायाळ पारवा मी झुरतो तुझ्याचसाठी
नाजुक रेशमाच्या विणतो मनांत गाठी
ती आस मीलनाची छळिते मुक्या जिवास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।।३।।



## चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला

चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला
भावनांच्या ओंजळीने शिंपितो प्रेमे तुला ॥

नाचतो चतुरंग वेडा या मनीं धुंदाऊनी
प्राशितो मधुगंध सारा लाजऱ्या स्पर्शातुनी
रेशमी सहवास गहिरा भूल का घाली मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ १ ॥

अंतरी गोंजारती स्वप्नील भोळचा भावना
सांगती हितगुज त्यांना गंधवेडचा कल्पना
चैत्रपक्षांच्या स्वरांची ओढ का लागे मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ २ ॥

आसमंती दूर जाती या मनाचे पारवे
मूक त्याना साद देती भावनांचे कारवे
लोचनी फसव्या मृगाचा भास का होई मला
चंदनी बागेत फुलल्या लाजऱ्या माझ्या फुला ॥ ३ ॥



## भूलवून दूर जाशी रतिचंचले मनास

भुलवून दूर जाशी रतिचंचले मनास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।।

येता समीप तू ग, मिळतो सखे निवारा
स्वप्नील भावनांचा फुलतो मनी पिसारा
नक्षत्र तारकांचा विळखा पडे नभास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।। १ ।।

सुखवून दूर जाती स्पर्शात गंध वारे
तो गंध प्राशुनी मी रचिले किती मनोरे
तव साज यौवनाचा गोंजारितो मनास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।। २ ।।

घायाळ पारवा मी झुरतो तुझ्याचसाठी
नाजुक रेशमाच्या विणतो मनांत गाठी
ती आस मीलनाची छळिते मुक्या जिवास
हुरहुर वेड लावी मजला क्षणाक्षणास ।।३।।



## परतून रात्र गेली जुळवून प्रीतीबंध

परतून रात्र गेली जुळवुन प्रीतीबंध
स्पर्शातल्या सुखाचा बिलगे मनास गंध ।।

मनभोर लोचनानी केलास तू इशारा
नवलाख तारकांचा फुलला नभी पिसारा
लाजून चूर झाला मेघात चांद धुंद
स्पर्शातल्या सुखाचा बिलगे मनास गंध ।। १ ।।

येता समीप तू ग फुलले कळीत फूल
ओढाळ या जिवाला पडली क्षणिक भूल
सखये तुझा नि माझा जडला ऋणानुबंध
स्पर्शातल्या सुखाचा बिलगे मनास गंध ।। २ ।।

स्वप्नील चांदण्यानी विळखा दिला मनास
तव रेशमी करानी गोंजारिले उरास
मोहून शुक्रतारा हसला हळुच मंद
स्पर्शातल्या सुखाचा बिलगे मनास गंध ।। ३ ।।



## साजणा स्वप्नी येशील का

साजणा स्वप्नी येशील का
परिमळ तो तव स्पर्शसुखाचा मजला देशील का ॥

व्याकूळ मी रे तुज भेटाया
प्रीत गुलाबी बिलगे हृदया
गुज मनातिल तुझ्या फुलाचे
ऐकून जाशील का ॥ साजणा स्वप्नी...१ ॥

धुंद कळ्यातुन समीर वाहे
सांगे मज मी तुझीच आहे
मनात फुलले प्रीत चांदणे
वेचुन घेशील का ॥ साजणा स्वप्नी...२ ॥

आस जागते आतुर नयनी
प्रीत अर्पिण्या तुझिया चरणी
दोन मनाचे सूर बसंती
छेडुन जाशील का ॥ साजणा स्वप्नी...३ ॥



# जिवलगा जाऊ नको रे दूर

जिवलगा जाऊ नको रे दूर
तव प्रीतीची ओढ सांगती नयनातिल हे पूर ॥

दोन मनाची जुळता नाती
भाव उरी का व्याकूळ होती
अंतरात वीणेवर घुमतो विरहाचा रे सूर
जिवलगा जाऊ नको रे दूर ॥ १ ॥

चंद्र चांदण्या उदास सारे
प्रीतवनी ना वसंत वारे
आठवणींचे दाट दाटले आज उरी काहूर
जिवलगा जाऊ नको रे दूर ॥ २ ॥

विनविते तुला तुझी दिवाणी
तुजविण अधुरी प्रेमकहाणी
रात्रंदिन या जिवा जाळिते गोड तुझी हुरहुर
जिवलगा जाऊ नको रे दूर ॥ ३ ॥



## विश्वात आज माझ्या मी एकटाच आहे

विश्वात आज माझ्या मी एकटाच आहे
जागृत यातनांची सरिता भरुन वाहे ॥

मी वेचिल्या प्रीतीची डोळ्यात साद आहे
अव्यक्त भावनांची शब्दात साक्ष आहे ॥

स्वप्नातल्या कळ्यांचा हृदयात गंध आहे
जो सूर छेडिला मी श्वासात मूक आहे ॥

मौनातली प्रतिक्षा जागीच आज आहे
दैवातली परिक्षा नियती दुरुन पाहे ॥

माझ्याच भोवताली माझेच विश्व आहे
माझ्याच तालबोली माझेच गीत आहे ॥



# गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे

गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे
हे पाखरू तुझे रे आहे उदासवाणे ।।

जे स्वप्न माळिले मी विरले क्षणांत सारे
येईल सांग का ते आकारूनी पुन्हा रे
चित्ती अबोल झाले मौनातले बहाणे
गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे ।। १ ।।

गगनात चंद्र तारे सारे कसे उदास
विरहातली व्यथा ही अंधारते मनास
तुजविण शून्य भासे जगणे असे दिवाणे
गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे ।। २ ।।

अव्यक्त भावनांच्या आल्या अनंत लाटा
गुंफून दूर गेल्या फुलवीत स्वप्नवाटा
व्याकुळ जीव होई स्मरता तुझे उखाणे
गाऊ नकोस आता ते गोड प्रीतगाणे ।। ३ ।।



# साजणा सांगु कशी मी, रात्र होती गंधली

साजणा सांगु कशी मी, रात्र होती गंधली
जाग येता लोचनी, ती स्वप्नमाला भंगली ॥

प्रीतीच्या कुंजात माझ्या चंदनी होते धुके
भेटण्या व्याकुळ होते भावपक्षी ते मुके
गोडशी चाहूल येता लाज गाली रंगली
साजणा सांगू कशी मी, रात्र होती गंधली ॥ १ ॥

नील व्योमी धुंद होता हासरा तो चांदवा
प्रीतगाणे गात होता लाजरा तो पारवा
स्पंदने तालात होती अंतरी या धुंदली
साजणा सांगू कशी मी, रात्र होती गंधली ॥ २ ॥

मी सुखाचे चांदणे कैफात ओठी प्राशिले
गंधवेडे भाव ते स्पर्शात सारे जाणिले
ती मिठी पडता करांची नीज सारी संपली
साजणा सांगू कशी मी, रात्र होती गंधली ॥ ३ ॥



# हा चांद अंबरात भासे कसा उदास

हा चांद अंबरात भासे कसा उदास
हे भाव अंतरीचे मी ऐकवू कुणास ।।

वाटे अबोल झाले कुंजात गंध वारे
व्याकुळ पक्षी गेले स्पर्शून भाव सारे
आरास तारकांचा वाटे मना भकास
हा चांद अंबरात भासे कसा उदास ।। १ ।।

स्वप्नातल्या कळ्यांचे कोमेजले फुलोरे
मौनातल्या व्यथांचे भारावले मनोरे
आभास सावल्यांचा जाळी वृथा उरास
हा चांद अंबरात भासे कसा उदास ।। २ ।।

हा एकलेपणा रे, ना साहवे मनास
तुजविण मी प्रिया रे, जगणे उगा कशास
आलाप भावनांचा भेटे सुरासुरास
हा चांद अंबरात भासे कसा उदास ।। ३ ।।



## चंद्र धुंद चांदण्यात, स्वप्न धुंद पापण्यांत

चंद्र धुंद चांदण्यात, स्वप्न धुंद पापण्यात
गीत होऊनी स्वरात, येऊन जा, येऊन जा ॥

धुंद या क्षणाक्षणांत, प्रीत ये अशी भरात
शब्द शब्द अंतरात, वेचुन जा, वेचुन जा ॥ चंद्र धुंद...१ ॥

ही नवीन चांदरात, साज दाविते नभात
सूर मूक स्पंदनात, छेडुन जा, छेडुन जा ॥ चंद्र धुंद...२ ॥

स्वप्न तूच लोचनात, विश्व तूच रे मनात
जीव गुंतला तुझ्यात, भेटुन जा, भेटुन जा ॥ चंद्र धुंद...३ ॥



# छेडु नको सूर नवे धुंद मैफलीत

छेडु नको सूर नवे धुंद मैफलीत
गंधाविण प्रीत झुरे आज या कळीत ।।

गीत नको गाऊ जे लांबले समेत
सूर नको पाहू ते थांबले लयीत
जीव जळे प्रीतीचा ताल आठवीत
छेडु नको सूर नवे धुंद मैफलीत ।। १ ।।

हासती उदास नभी मंद मंद तारे
भासती मनास आज गंधहीन वारे
खिन्न फिरे चांदवा निशेस जागवीत
छेडु नको सूर नवे धुंद मैफलीत ।। २ ।।

थांबव झंकार तुझे धुंद सप्तकात
अर्थहीन आस उरे दूर अंतरात
देऊ नको आठवणी आज भैरवीत
छेडु नको सूर नवे धुंद मैफलीत ।। ३ ।।



# बघतेस का अशी तू सजणी वळुन मागे

बघतेस का अशी तू, सजणी वळुन मागे
हृदयात पाखराना तव ओढ मात्र लागे ॥

पाहुन या घडीला शृंगार यौवनाचा
तालात धुंद नाचे चतुरंग या मनाचा
हे गूज जाणता तू भरशील मात्र रागे
बघतेस का अशी तू सजणी वळून मागे ॥ १ ॥

तुज गोड साद देण्या आतुर लोचने ही
ना सांगती कशी ती प्रीतीविनाच काही
किमया तुझ्या रुपाची विणते मनात धागे
बघतेस का अशी तू सजणी वळून मागे ॥ २ ॥

वाटे खुळचा मनाला, जाऊ नकोस दूर
बेभान पाखरे ही गाती नवीन सूर
साक्षात मीलनाचा मतिधुंद भास जागे
बघतेस का अशी तू सजणी वळून मागे॥ ३ ॥



# राजसा गेलास तू काहीच ना रे बोलता

राजसा गेलास तू काहीच ना रे बोलता
प्रीतीची मजला कळेना हीच का रे सांगता ।।

रेशमी नाजुक नाते मी मनी जे गुंफिले
दूर तू जाताच सारे पाश त्याचे संपले
सांज येते दाटुनी वाटा स्मृतीच्या शोधता
प्रीतीची मजला कळेना हीच का रे सांगता ।। १ ।।

दूर गेल्या चांदराती ना रुपेरी ते धुके
भावपक्षी गीत गाण्या आजला झाले मुके
क्षीण भासे नीलव्योमी शुक्रतारा जागता
प्रीतीची मजला कळेना हीच का रे सांगता ।। २ ।।

राजसा फिरूनी पुन्हा येशील का तू जीवनी
पारिजाती गंध तो देशील का तू मीलनी
ओढ लागे लोचना दिनरात्र क्षण मी मोजता
प्रीतीची मजला कळेना हीच का रे सांगता ।। ३ ।।



# पाहुनी सखे नभात धवल चांदरात

पाहुनी सखे नभात धवल चांदरात
आठवणी मोहरती दूर अंतरात ॥

लाखलाख हे तारे मंद जागतात
प्रीतीच्या अबोल खुणा स्पर्श दावितात
दोन मनाची नाती जुळती अक्षरात
आठवणी मोहरती दूर अंतरात ॥ १ ॥

जागतो तुझाच सखे भास पापण्यात
साद घालतो लपून चंद्र चांदण्यात
भाव फुले प्रीतीचा मूक स्पंदनात
आठवणी मोहरती दूर अंतरात ॥ २ ॥

स्वप्नाना जाग उठे का क्षणाक्षणात
शब्दाना पंख फुटे भारल्या मनात
सूर सजे गीताचा आज सप्तकात
आठवणी मोहरती दूर अंतरात ॥ ३ ॥



## जगणे नको असे हे, वाटे हवे कशास

जगणे नको असे हे, वाटे हवे कशास
हा भार यातनांचा रात्रंदिनी उशास ।।

झोळीत आज माझ्या जागा नसे सुखाला
वाट्यास मात्र येती दुखे: क्षणाक्षणाला
निष्पाप भावपक्षी होती मुके उदास
जगणे नको असे हे, वाटे हवे कशास ।। १ ।।

या शुष्क जीवनात येतो सदा उन्हाळा
माझ्या मनी व्यथांच्या का पेटतात ज्वाळा
'येईल रे हिवाळा' कुणी शांतवी मनास
जगणे नको असे हे, वाटे हवे कशास ।।२।।

हे दुःख आज माझ्या येते भरून पोटी
शब्दात साठविता होई कथाच मोठी
अंधार जाऊनी हा येईल का प्रकाश
जगणे नको असे हे, वाटे हवे कशास ।। ३।।



# दूर तू जातेस तेव्हा तेव्हां स्पंदने हेलावती

दूर तू जातेस तेव्हां स्पंदने हेलावती
आसवांना जाग येई लोचने पाणावती ॥

गंध तू चोरून जाशी प्रीतीच्या कुंजातला
स्पर्श तू सांगून जाशीं रात्रीच्या धुंदीतला
भावनांच्या मूक लाटा ना मनी संथावती
दूर तू जातेस तेव्हा स्पंदने हेलावती ॥ १ ॥

दूर जाई तुजसवे ग चंद्रमा गगनातला
भास वेडा सूर छेडी प्रीतीच्या गीतातला
भावपक्षी प्रीतवेडे गूज सारे सांगती
दूर तू जातेस तेव्हां स्पंदने हेलावती ॥ २ ॥

ओढ वेडी जागते स्वर गुंफिते विरहातला
गीत ओठी थांबते मधु आठवे स्पर्शातला
आठवांची दाटी होता पापण्या भारावती
दूर तू जातेस तेव्हा स्पंदने हेलावती ॥ ३ ॥



# झाली सखे पहाट धुंद रात्र संपली

झाली सखे पहाट धुंद रात्र संपली
फुलल्या कळीतला मधु प्राशून जागली ॥

बेफान स्पर्श गेला गंधास सांडुनी
प्रीतीस साज आला धुंदीत नाचुनी
भ्रमरास पाहुनी कळी कुंजात लाजली
झाली सखे पहाट धुंद रात्र संपली ॥ १ ॥

नभी चंद्र दूर गेला मेघास लोटुनी
शततारका उजळल्या दोघास पाहुनी
ती शुक्रचांदणी कशी मोहून जागली
झाली सखे पहाट धुंद रात्र संपली ॥ २ ॥

झुलवून रात्र गेली कमळास स्पर्शुनी
सुखवून प्रीत गेली अधरास अर्पुनी
मधुरात्र मीलनाची गंधात नाहली
झाली सखे पहाट धुंद रात्र संपली ॥ ३ ॥



## संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे

संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे
जीव वेड्या आठवांचे गीत गाताना झुरे ।।

प्रीतीच्या कुंजातल्या पाऊलवाटांच्या खुणा
लोपल्या कालसवे चाहूल त्यांची ना कुणा
मखमली स्पर्शातला तो गंध आता ओसरे
संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे ।। १ ।।

दूर गेले ते हिवाळे शिंपुनी ते गारवे
व्यर्थ त्याना धुंडिती वेड्या मनाचे पारवे
जागजागी गोठले गंधाळ प्रीतीचे झरे
संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे ।। २ ।।

अंतरी मी रेखिली स्वप्ने सुखाची गोड ती
साद त्याना घालिते वेड्या मनाची ओढ ती
दुःख ते स्पर्शून जाती भावनांची पाखरे
संपले नाते क्षणांचे प्रीत आता ना उरे ।। ३ ।।





मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# पौर्णिमेच्या चांदराती स्वप्न ते मी पाहिले

पौर्णिमेच्या चांदराती
स्वप्न ते मी पाहिले
स्पर्श होताना करांचा
मी स्वताःशी लाजले ।।

अधरस्पर्शाच्या सुखाची
जीवघेणी ओढ ती
प्रीतीच्या गंधात न्हाली
धुंद वेडी रात्र ती ।।

चंद्रकिरणांच्या कवेत
विश्व होते लोपले
धुंद प्रीतीच्या नशेत
ओठ कानीं बोलले ।।

गोड त्या स्वप्नात होती
मीलनाची आर्तता
आठवे जागेपणी मज
प्रीतीची ती सांगता ।।



## शोधून ना मिळाला तो प्रीतीचा निवारा

शोधून ना मिळाला तो प्रीतीचा निवारा
माझ्याच कल्पनानी मज दाविला किनारा ।।

मौनात भावनांचा होता उरी दरारा
मनपारवा उडाला मिळताक्षणी इशारा ।।

स्वप्नील लोचनांच्या धुंदावला थरारा
स्पर्शून भाव गेला हृदयातल्या शिवारा ।।

बघता वळून तेव्हां गगनातल्या चकोरा
मी कल्पिल्या सुखांचा फुलला मनी फुलोरा ।।

वेचून त्या क्षणांचा मी बांधिला मनोरा
पाहून शिल्प त्याचे भारावला किनारा ।।



## राजसा, येऊ नको मंदिरी पुन्हां पुन्हां

राजसा, येऊ नको मंदिरी पुन्हां पुन्हां
प्रीत तुला दिधली मी, एवढाच रे गुन्हा ॥

विसर कधी जुळते ते गीत भावनांचे
विसर रेशमी नाते दोन पाखरांचे
कुंज तो स्वप्नीचा आठवू नको पुन्हां
राजसा, येऊ नको मंदिरी पुन्हा पुन्हां ॥ १ ॥

दाटुनी मन आले जरि गोड आठवानी
विसर साद दिधली ती मूक लोचनानी
बघु नको वळुनी पुन्हां, आज बोलक्या खुणा
राजसा, येऊ नको मंदिरी पुन्हां पुन्हां ॥ २ ॥

वंचित तू आज जरि प्रीतीच्या सुखाला
साहुनी हे दुःख मनीं विसर या फुलाला
तल्खली विरहाची भासवु नको कुणा
राजसा, येऊ नको मंदिरी पुन्हां पुन्हां ॥ ३ ॥



# सखे तुझ्या मनातले मला कसे कळायचे

सखे तुझ्या मनातले मला कसे कळायचे
बघून तारका नभी तुला मनीं स्मरायचे ॥

अबोलशा दिशातुनी तुझीच जाग भासते
मनातल्या कळचातुनी तुझेच रूप हासते
तुझ्यात जीव गुंतुनी सदाच मी झुरायचे
बघून तारका नभी तुला मनी स्मरायचे ॥ ......१ ॥

तुला ग स्पर्शिता कसा उरात गंध वाहतो
पराग प्रीतीचा सखे नवा वसंत पाहतो
मनात माळुनी झुले वृथाच मी झुलायचे
बघून तारका नभी तुला मनीं स्मरायचे ॥ ......२ ॥

जिवास या पदोपदी तुझीच ओढ जाळिते
तुझेच स्वप्न लोचनी अजुन वाट चालते
सदैव दूर राहुनी हताश मी जगायचे
बघून तारका नभी तुला मनी स्मरायचे ॥ ...... ३ ॥



# चांदण्याची वाट आता जिवलगा पाहु नको

चांदण्याची वाट आता जिवलगा पाहु नको
चिंतनी राहुन माझ्या स्वप्न तू पाहु नको ।।

मी तुझी नव्हते कुणी हे सत्य तू ना मानिले
यातनांचे मात्र ओझे मी मनीं रे वाहिले
वंचनेचे दुःख आता तू कुणा दावु नको
चांदण्याची वाट आता जिवलगा पाहु नको ।। १ ।।

विसर आता जीवघेणी तळखली विरहातली
भेट ती देऊ नको रे आसवे नयनातली
भावनांची ओंजळी भरूनी उगा वाहु नको
चांदण्याची वाट आता जिवलगा पाहु नको ।। २ ।।

दूर जा स्वप्नांसवे तू विसर ही मायापुरी
मीलनावाचुन कवळे सांज माझ्या अंतरी
मृगजळामागे कधी रे तू पुन्हा धावु नको
चांदण्याची वाट आता जिवलगा पाहु नको ।। ३ ।।



## पाखरा तू सांगना रे जीवनी येशील का

पाखरा तू सांगना रे जीवनी येशील का
प्रीतीच्या पंखातली ती ऊब तू देशील का ।।

मीलनासाठी तुझ्या रे जागती ही लोचने
भाव त्यांचे सांगताती अंतरीची स्पंदने
होउनी माझी परी मेघातुनी येशील का
प्रीतीच्या पंखातली ती ऊब तू देशील का ।। १ ।।

जाळिती वेडचा जिवाला लक्षतारे चांदण्या
तूच आता या जगी माझी व्यथा ही ऐकण्या
होउनी तू सावली स्वप्नातुनी येशील का
प्रीतीच्या पंखातली ती ऊब तू देशील का ।। २ ।।

आर्ततेने छेडितो माझ्या सुरांची सप्तके
तू कधी येशील म्हणुनी गीत गातो कौतुके
होउनी स्वरमोहिनी सूरातुनी गाशील का
प्रीतीच्या पंखातली ती ऊब तू देशील का ।। ३ ।।



# शब्द न्हाले अमृताने नाचले ओठावरी

शब्द न्हाले अमृताने नाचले ओठावरी
आगळे मी प्रेम केले भाळुनी कोणावरी ॥

चंदनी चाहूल येता धुंद झाले रागिणी
लाजुनी मी हासले माझ्या बिलोरी दर्पणी
स्वप्न झंकारून आले गंधलेल्या अंतरी
आगळे मी प्रेम केले भाळुनी कोणावरी ॥ १ ॥

अंबरीच्या तारकांनी प्रेम माझे पाहिले
अंतरीच्या पाखरांनी गोड गाणे गाइले
फूल मी झाले कळीचे प्रीतीच्या वेलीवरी
आगळे मी प्रेम केले भाळुनी कोणावरी ॥ २ ॥

आज मी सांगु कशी स्वप्नात माझ्या रंगले
प्रेम सारे वेचुनी शब्दात माझ्या गुंफले
रेशमी धाग्यात नाते जोडले जन्मांतरी
आगळे मी प्रेम केले भाळुनी कोणावरी ॥ ३ ॥



# बेभान होऊनी तू गाऊ नकोस गाणे

बेभान होऊनी तू गाऊ नकोस गाणे
हे पाखरू तुझे रे आहे उदासवाणे ।।

कुंजात आज माझ्या ना गंध रातराणी
कंठात आज माझ्या ना धुंद प्रेमगाणी
सूरात थांबले रे तालातले तराणे
हे पाखरू तुझे रे आहे उदासवाणे ।। १ ।।

हृदयात गंधलेल्या गेल्या झुरून आशा
पदरात आज आल्या दारुण त्या निराशा
ओठात येऊनी ते विरले तुझे उखाणे
हे पाखरू तुझे रे आहे उदासवाणे ।। २ ।।

मौनात आज मी रे आहे तुझी दिवाणी
दु:खात माखली रे तू ऐक ही कहाणी
होतेच प्रावतनी रे तू विरहातले नहाणे
हे पाखरू तुझे रे आहे उदासवाणे ।। ३ ।।



## चांदणे फुलले नभी सजणी अशी जवळी रहा

तो– चांदणे फुलले नभी सजणी अशी जवळी रहा
ती– प्रीतीचा रे चंद्रमा डोळ्यात माझ्या तू पहा ।।

तो– गंध ओथंबून वाहे आसमंती गारवा
ती– अंतरीचा ताल सांगे स्वप्नपंखी पारवा
तो– मीलना आतुरला माझा तुझा ग जीव हा
चांदणे फुलले नभी सजणी अशी जवळी रहा ।। १ ।।

ती– वेचुया शततारका नीलांबरी रे जाउनी
तो– प्रीतीचे झंकार छेडु आज ओठी गाउनी
ती– गुंफुया वेड्या मनाची स्वप्नमाला ती 'अहा'
प्रीतीचा रे चंद्रमा डोळ्यात माझ्या तू पहा ।। २ ।।

तो– रेशमी नात्यात वेडा जीव हा धुंदावला
ती– प्रीतीचा रे स्पर्श माझ्या स्पंदनी हेलावला
तो– ताज बांधु दो मनांचा स्वर्ग पाहुया नवा
चांदणे फुलले नभी सजणी अशी जवळी रहा ।। ३ ।।



## गेलीस तू अबोली ना ऐकताच गीत

गेलीस तू अबोली, ना ऐकताच गीत
वैरीण आज झाली, माझ्या मनात प्रीत ।।

कुंजात आज माझ्या नाही वसंत आता
दाटून कंठ येतो हे आर्त गीत गाता
घुमते तुझीच साद हृदयातल्या दरीत
वैरीण आज झाली माझ्या मनात प्रीत ।। १ ।।

गंधाळ आठवांच्या त्या लांबती कतारी
एका क्षणात येती जुळुनी मनीं सतारी
येऊन बोल ओठी विरती मुक्या लयीत
वैरीण आज झाली माझ्या मनात प्रीत ।। २ ।।

झुरतो ग जीव वेडा तुजलाच आठवीत
फिरतो तुझ्या स्मृतीचा मधुगंध साठवीत
ना संपते व्यथा ही गाऊन भैरवीत
वैरीण आज झाली माझ्या मनात प्रीत ।। ३ ।।



# माझे मला कळेना मी भाळले कुणाला

माझे मला कळेना मी भाळले कुणाला
ती ओढ आज लागे हृदयातल्या फुलाला ॥

पहिलाच स्पर्श होता अंगी फुलारले मी
हातात हात घेता चित्ती सुखावले मी
झंकार भावनांचे फुलले क्षणाक्षणाला
माझे मला कळेना मी भाळले कुणाला ॥ १ ॥

नयनी सजून आली स्वप्ने किती सुखाची
ना पाहिली कधी मी पाऊलवाट त्यांची
लागो न दृष्ट माझी अनमोल या घडीला
माझे मला कळेना मी भाळले कुणाला ॥ २ ॥

मज भासले मनीं मी झाले क्षणांत राणी
मोहून गाइली मी तालात गोड गाणी
ते स्वप्न मीलनाचे गुंफू आता कशाला
माझे मला कळेना मी भाळले कुणाला ॥ ३ ॥



# अस्तावली प्रिया ती स्वप्नातली पहाट

अस्तावली प्रिया ती स्वप्नातली पहाट
गगनांत चांदण्याची पाहु नकोस वाट ।।

स्वप्नील भावपक्षी गेले निघून दूर
झुरती मनात माझ्या त्यांचे अजुन सूर
विरहात मूक आसू भिजती उरी दंवात
गगनात चांदण्याची पाहु नकोस वाट ।। १ ।।

ना चंद्र तारकांना आता मनात थारा
गंधाविणा विसावे कुंजात मंद वारा
सरला वसंत आता फुलुनी कळ्या फुलात
गगनात चांदण्याची पाहु नकोस वाट ।। २ ।।

जगण्यास एकटी मी ठेवा पुरे स्मृतींचा
मधुमास तो नको रे गंधाळल्या क्षणांचा
नि:शब्द वादळे ती शमली मुक्या मनात
गगनात चांदण्याची पाहु नकोस वाट ।। ३ ।।



## रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा

दोघे– रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा
जाग आहे चांदण्याची कुंद आहे गारवा ॥

तो– भावना वेडया मनाच्या मी कशा सांगू तुला
ती– वाचुनी नयनी तुझ्या रे साजणा कळल्या मला
तो– अंतरीची ओढ सांगे चैत्रमासी पारवा
दोघे– रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा ॥ १ ॥

ती– घेऊनी जवळी मला रे स्वप्न वेडे तू पहा
तो– रेखिले मी स्वप्न माझे जागते सजुनी अहा
ती– प्रीतीच्या वेलीवरी फुलवू गुलाबी ताटवा
दोघे– रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा ॥ २ ॥

तो– लाजुनी हसती सखे शततारका तारांगणी
ती– सांगती सखया तुला त्या ' मी तुझी रे चांदणी '
तो– ये सखे कुंजात प्राशू गंध प्रीतीचा नवा
दोघे– रात्र आहे मीलनाची धुंद आहे चांदवा ॥ ३ ॥



## निळ्या नभात साजणा, नवीन चंद्र हासतो

ती– निळ्या नभात साजणा, नवीन चंद्र हासतो
तो– तुला सखे ग पाहुनी, मनात चूर लाजतो ।।

ती– अबोल आसमंत हा, धरेवरी विसावला
तो– तुझ्याच मीलनी सखे, पराग हा सुखावला
ती– उरात गंध प्रीतीचा लपून मंद वाहतो
निळ्या नभात साजणा नवीन चंद्र हासतो ।। १ ।।

तो– सुरेल सूर सांग तू, हवा तुला ग कोणता
ती– सुरात सूर प्रीतीचा, छेड तू न सांगता
तो– असाच सूर ऐकण्या, नभात चंद्र जागतो
तुला सखे ग पाहुनी, मनांत चूर लाजतो ।। २ ।।

ती– अजुन रात्रचांदण्या, कशास मंद जागती
तो– नभात दूर राहुनी तुझेच रूप पाहती
ती– तुझाच शब्द शब्द रे फुलासमान भासतो
निळ्या नभात साजणा, नवीन चंद्र हासतो ।। ३ ।।



# लोचनांची मूक भाषा लोचना सांगू नको

लोचनांची मूक भाषा लोचना सांगू नको
मीलनाची स्वप्नमाला तू मनी गुंफू नको ।।

अंतरी दूरांत कोठे दुःख माझे दाटले
प्रीतीचे गंधाळ ओढे आज सारे आटले
नीलपंखी भावनाना साद तू घालू नको
लोचनांची मूक भाषा लोचना सांगु नको ।। १ ।।

मोहमायी भासल्या त्या चांदराती मंचकी
जाळितो अजूनि मना तो गंध त्यांचा चंदनी
वाळल्या कुंजात माझ्या चांदणे पेरु नको
लोचनांची मूक भाषा लोचना सांगू नको ।। २ ।।

जागती नयनी मधाळी आठवांचे काफिले
सांगती तुजला कहाणी रंगलेली मैफिले
थांबलेल्या सातकाना तू पुन्हा छेडु नको
लोचनांची मूक भाषा लोचना सांगु नको ।। ३ ।।



## जीवनी नाहीस तू आभाळ वाटे फाटले

जीवनी नाहीस तू आभाळ वाटे फाटले
यातनांचे पूर ओले अंतरी या दाटले ।।

आज विरही गीत गाते हे अभागी पाखरू
जीवघेण्या आठवाना मी कशी रे आवरू
पापण्यांचे काठ दोन्ही आसवानी साठले
यातनांचे पूर ओले अंतरी या दाटले ।। १ ।।

चैत्रपक्षी दूर जाती दावुनी प्रीतीखुणा
जागजागी खिन्न भासे मार्ग त्यांचा रे सुना
तुजविणा विश्वातले रे प्रेम सारे आटले
यातनांचे पूर ओले अंतरी या दाटले ।। २ ।।

आज मी वीणेवरी गाते व्यथेचा जोगिया
सांगती अश्रू कहाणी अंतरीची माझिया
वाहुनिया दु:ख येती भावनांचे काफिले
यातनांचे पूर ओले अंतरी या दाटले ।।३।।



# कळ्यातुनी, फुलातुनी, वसंत धुंद जागतो

ती– कळ्यातुनी, फुलातुनी, वसंत धुंद जागतो
तो– तुझ्या ग प्रीतीचा सखे फुलून साज दावितो ॥

ती– दिशादिशातुनी वनी अबोल वाहते हवा
तो– तुझ्या ग केतकी तनूस स्पर्शिते कशी पहा
ती– निसर्ग गंध प्राशुनी विमुक्त मंद हासतो
कळ्यातुनी, फुलातुनी, वसंत धुंद जागतो ॥ १ ॥

तो– निवांत या क्षणी मला तुझ्यासवे विसावु दे
ती– अमोल प्रीतीची अशी घडी मना सुखावु दे
तो– उरात सूर शोधिता तुझाच सूर लागतो
कळ्यातुनी, फुलातुनी, वसंत धुंद जागतो ॥ २ ॥

ती– मिटुन पापण्या सख्या तुला समीप पाहते
तो– तृषार्त लोचनी मला नवीन स्वप्न भासते
ती– अधीर मूक जीव हा तुझीच साथ मागतो
कळ्यातुनी, फुलातुनी, वसंत धुंद जागतो



# ना मला साहवे विरहाचे हे ऊन

ना मला साहवे विरहाचे हे ऊन
तू सांग सख्या रे येशील कधी परतून ।।

दिनरात जागती नयनांच्या या वाती
अंतरी पाखरे विरही गाणे गाती
आसवे थांबती नयनाना बिलगून
तू सांग सख्या रे येशील कधी परतून ।। १ ।।

कधी फुलेल का तो फिरुनी प्रीतवसंत
मनी उठती तयाच्या उर्मी गोड अनंत
हिरवळल्या वाटा जाती आता करपून
तू सांग सख्या रे येशिल कधी परतून ।। २ ।।



अर्थहीन वाटे एकाकी हे जगणे
प्राक्तनात लिहिले तुजसाठी मी झुरणे
मन उदास फिरते स्वप्नाना आठवून
तू सांग सख्या रे येशिल कधी परतून ।। ३ ।।

# विसर आता चांदरात विसर प्रीत चांदणे

विसर आता चांदरात विसर प्रीतचांदणे
बघु नकोस नयनी पुन्हा मधुर स्पप्न देखणे ॥

हिरवळल्या प्रीतीच्या आठवु नको खुणा
नावरले दुःख जरि भासवु नको कुणा
विसर प्रिया त्या शपथा ते रुसणे हासणे
विसर आता चांदरात विसर प्रीतचांदणे ॥ १ ॥

नाचला मनी पराग स्वप्न पाकळ्यातुनी
सांडला सुगंध मंद प्रीतीच्या क्षणातुनी
विसर आता मायावी तो वसंत पाहणे
विसर आता चांदरात विसर प्रीतचांदणे ॥ २ ॥

विरली दूर अंतरात आस मीलनाची
संपली कथा व्यथेत दोन पाखरांची
विसर सावल्यांची ती संगत ते चालणे
विसर आता चांदरात विसर प्रीतचांदणे ॥ ३ ॥



# निळ्या नभात चांदणे कसे दुरून हासते

दोघे– निळ्या नभात चांदणे, कसे दुरून हासते
अबोल धुंद ही घडी मनास गोड भासते ।।

तो– निळीच शाल ओढुनी विसावल्या दहा दिशा
ती– कवेत विश्व व्यापुनी स्थिरावली पहा निशा
तो– निळ्या कळ्या फुलातुनी तुझेच बिंब धावते
अबोल धुंद ही घडी मनास गोड भासते ।। १ ।।

तो– फुलात गंध प्राशितो सखे पराग धुंद हा
ती– लपून जाग दावितो ढगात चंद्रमा पहा
तो– सजुन आज लोचनी तुझेच स्वप्न जागते
अबोल धुंद ही घडी मनास गोड भासते ।। २ ।।

तो– समीप ये सखे अशी, मनात ओढ या क्षणी
ती– अधीर जीव हा सख्या कवेत घे मला झणी
तो– तुझीच प्रीत अतरी गुपीत गोड सांगते
अबोल धुंद ही घडी मनास गोड भासते ।। ३ ।।



# सांगु कशी प्रिया मी माझी तुला कहाणी

सांगू कशी प्रिया मी माझी तुला कहाणी
विरहातल्या व्यथेने झाले तुझी दिवाणी ॥

तुजवाचुनी फिरे हे मनपाखरू विराणे
वाटेकडे तुझ्या रे बघते उदासवाणे
येते तुझ्या स्मृतीने डोळ्यात आज पाणी
सांगु कशी प्रिया मी माझीं तुला कहाणी ॥ १ ॥

फुलणार ना पुन्हा ती प्रीतीपहाट लाली
हृदयात पाखरांची तिन्हिसांज मात्र झाली
ठरले अखेर मी रे स्वप्नातलीच राणी
सांगु कशी प्रिया मी माझी तुला कहाणी ॥ २ ॥

बिलगे व्यथेस माझ्या मधुगंध आठवांचा
एकांत भास दावी माझ्याच सावल्यांचा
येतात शांतवाया ती अर्थहीन गाणी
सागु कशीं प्रिया मी माझी तुला कहाणी ॥ ३ ॥



## तान्हुल्या या राजसाला आज मी जोजाविते

तान्हुल्या या राजसाला आज मी जोजाविते
गोजिरवाणे चित्र सुखाचे लोचनी मी पाहते, नीज बाळा ।।

झाडावरचे चिमणे पक्षी निजले अपुल्या घरट्यात
दमली थकली गाई वासरे निजली अपुल्या गोठ्यात
काळोखाची शाल घेऊनी रजनीमाता जागते, नीज बाळा ।। १ ।।

लुकलुक करूनी झोपी गेली नक्षत्रे अन् तारका
ढगात फिरूनी चंदामामा झोपी गेला बालका
इवल्या नयनी काजळ भरूनी स्वप्न उद्याचे पाहते, नीज बाळा ।। २ ।।

थांबव चाळा, माझ्या बाळा, थांबव वाळा सोन्याचा
पाठशिवणीचा खेळ थांबला, चिमण्या राघु मैनेचा
सळसळ पानातुन थांबली सावळ वारे सांगते, नीज बाळा ।। ३ ।।

**संगीत**
**अशोक पत्की**

**गायिका**
**नीला रवींद्र**



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३०७७
दा. क्र. २३०५५
काव्य ७४६५३
संग्रह शाखा (स्थळ

REFBK-0023855
REFBK-0023855